धनुर्धारिरचित

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

आमच्यांतील एक अमोलिक स्त्रीरत्न.

# देवी अहिल्याबाई होळकरीण.

देवि अहिल्याबाई, झालीस जगत्रयांत तूं धन्या।
न न्यायधर्मनिरता, अन्या कलिमाजि ऐकली कन्या ॥ ३ ॥

मोरोपंत.

हें पुस्तक,

**जनार्दन महादेव गुर्जर,**

बुकसेलर आणि पब्लिशर रामवाडी, मुंबई,

झांनीं छापिलें.

जानेवारी, सन १९०८.

आवृत्ति २ री.

(सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.)

किंमत २ आणे.

मुंबईत
जावजी दादाजी
ह्यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापून
प्रसिद्ध केलें.

श्री ग्रंथ संग्रहालय

# आमच्यांतील एक अमूल्य स्त्रीरत्न—

# देवी अहिल्याबाई.

१ **ओळख**:–शिंदे या आडनांवाच्या कुळांत **अहिल्याबाई** सन १७३३ सालीं जन्मली, व पुढें इचा विवाह **खंडेराव होळकराशीं** झाला. **खंडेराव** हा मराठ्यांचा महाबलाढ्य सरदार **मल्हारराव होळकर** याचा पुत्र. होळकरांनीं माळव्यांत आपलें राज्य स्थापिलें आणि पेशव्यांचा नोकर या नात्यानें साऱ्या हिंदुस्थानभर त्यांचा भगवा झेंडा **मल्हाररावानें** नाचविला. त्या **मल्हाररावाची अहिल्याबाई** ही सून.

बायकांची जात ह्मणजे घरांतील कामधामाची मालकीण. बाहेरला कारभार सारा पुरुषांकडे. तेव्हां बायकांच्या आंगच्या अनेक गुणांचा विकास ह्मणजे घरांत, पडद्यांत काय तो. बाहेर त्यांचा कांहीं संबंध नसतो. बायका सर्वस्वीं पुरुषांच्या स्वाधीन. त्यांनीं सुखदुःख भोगावें एवढेंच काम. इतर सर्वस्व पुरुषांच्याच हातीं असावयाचें. हा असा प्रकार साधारणपणें आढळतो खरा. पण, प्रस्तुत प्रकरण हें कांहीं विलक्षणच! येथें ईश्वरी योजना ह्मणतात ती कांहीं अगदीं निराळीच. ह्मणजे अगदीं वाईट असे प्रसंग एकामागून एक येरीत असतां त्यांतच एक अशी बहार सोडून द्यावयाची कीं तीच पाहून मागलें सारें विसरून जावें. फूल चुरगळलें ह्मणजे बहारदार वास देतें तसा प्रकार केव्हां केव्हां मनुष्याचाही होतो. ह्मणजे अनेक असाध्य संकटांच्या माऱ्यानें चूर झालेला प्राणी आपल्या तेजानें व अप्रतिम गुणप्रकाशानें

असा चमकूं लागतो कीं बोलून सोय नाहीं. त्याचें तें गुण-तेज पाहून कैकजण अगदीं चकित होऊन जातात. अशां-पैकींच आमच्या **अहिल्यादेवीचा** प्रकार आहे. तो साद्यंत वर्णन करण्याचें महाभाग्य व अलभ्य लाभ अनायासें आला ह्मणून प्रस्तुत लेखकाची लेखणी, आपली आपल्याच ठिकाणीं धन्यता मानते !

२ **दुःखाचा पहिला कहरः**—होळकर ह्मणजे सरदारी पे-शाचे. ते होते तो काळ स्वराज्याचा. मुसलमानांनीं आपली सर्व सत्ता बळकाविली, ती परत घेण्यासाठीं मराठ्यांनीं आपल्या दुस्मनांशीं स्पर्धा चालविलेली, अशी ती वेळ. स्वातंत्र्यसौभाग्य मिळविण्यासाठीं जीवाकडे न पाहतां झगडण्याचा विडा उचल-णाऱ्यांपैकीं होळकर हे एकटे, आणि समशेरी चमकावीत स्वकु-ळाला व स्वजनांला आणि स्वदेशाला थोरवी आणण्याचें व्रत होळकर **मल्हाररावानें** धरिलेलें, तेव्हां समरभू, शत्रु, समशेर, युद्धें, यांत त्यांचें सारें आयुष्य वेंचावयाचें व त्यांतच त्यांचें मन सदा गुंग असणें हें अगदीं साहजिक होय; त्याचप्रमाणें सुख किंवा दुःख, आनंद अगर संतोष, फार काय, पुण्य अगर पाप, नरक किंवा स्वर्ग हे सर्व त्यांना समरप्रसंगांतच दिसावयाचे हें उघड आहे. **मल्हारराव,** पेशव्यांचे सरदार. नर्मदेपलीक-डील मुलुखाचे माळव्यांतील सुभेदार. दर्भसमिधा फेंकून हातांत पेशव्यांनीं नंगी समशेर वागविलेली व ती इतकी सदा हपाप-लेली कीं हरदम तिला दुस्मनच्या रक्ताची तान सारखी लाग-लेली. पेशव्यांकडील **राघोबादादा** हिंदुस्थानांत मुलुखगिऱ्या क-रण्यासाठीं नर्मदा ओलांडून आले. त्यांच्या बरोबरीनें होळकर, शिंदे, रणयज्ञांत स्वाहास्वधाकार उच्चारण्यास तय्यार असत. कुं-भेरीचा किल्ला जाटाचा. तो सर करावा हें पेशव्यांचें ह्मणणें.

शिंदे होळकरांनीं त्या किल्ल्याला मोर्चे लावून दिले. **मल्हारराव** होळकर दुस्मनांशीं झगडा करण्यासाठीं निघाले, तेव्हां त्यांचे चिरंजीव **खंडेराव ( अहिल्याबाईचा नवरा )** हा बापसे बेटा सवाई असें दुनयेकडून ह्मणवीन या ईर्षेनें बापाबरोबर समशेर चमकावीत आला होता. कुंभेरीस वेढा पडला, त्यांत या **खंडेराव** होळकरानें थोडासा पुढाकार घेत शत्रूला खिजविण्याचें काम चालविलें. सिंहाचा छावा स्वस्थ माशा हाकीत बसणार आहे थोडाच. तो शत्रूंवर चाल करीत असतां अकस्मात् शत्रूकडील एक गोळी **खंडेरावाच्या** मस्तकांत शिरली आणि त्यासरशीं ताडकन् **खंडेराव** खालीं पडला आणि स्वर्गवासी झाला. **मल्हाररावाचा** तो एकुलता एक आणि मोठा शूर मुलगा. रणांगणांत शत्रूंशीं झगडतांना मेला (इ०स०१७५४) हें दुःख **मल्हाररावास** अगदीं अनावर झालें. यावेळीं **अहिल्याबाईचें** वय सारें २१ वर्षांचें होतें. बिचारी बायको नवऱ्याच्या दुःखानें पण अगदीं होरपळून गेली. बायकांना वैधव्यापेक्षां दुसरें असह्य अन्य दुःख नाहीं. त्यांचें सारें सौभाग्य, त्यांचें सारें सुख, त्यांचे पंचप्राण ह्मणजे त्यांचा पति. आणि त्याचा वियोग ह्मणजे मग तो कांहीं त्यांना सहन होत नाहीं. आपला पति हाच आपला प्राण ही बायकांची समजूत आणि वर्तणूक असते. तेव्हां पतिनिधनाबरोबर आपल्याही प्राणाची आहुती अग्नीस देण्याला साध्वी स्त्रिया कमी करीत नाहींत. **अहिल्याबाई** महापतिव्रता आणि मोठी **साध्वी,** तिला आपल्या पतीचें मरण कळलें तेव्हां तिनें निर्धार केला कीं, आपण सती जावयाचें; ह्मणजे पतीच्या शवाबरोबर आपलाही देह अग्निनारायणास अर्पण करावयाचा. **मल्हाररावाचा** पुत्र एकुलता एक; मुलगा वारला त्याचें दुःख सर्वांगाचा दाह करीत आहे तोंच

सुनेची सता जाण्याची तयारी. त्यामुळें त्या बिचाऱ्याच्या दुःखाला पारावार नाहींसा झाला. तो आपल्या सुनेजवळ जाऊन ह्मणाला "मुली, खंडू मला सोडून गेला, माझी त्याला कींव आली नाहीं. आतां तूंही सोडून जाणार ह्मणतेस मर्जी तुझी! ह्मातान्यांची कींव तुला कोठून येणार? माझा खंडू मेला मी ह्मणत नाहीं. सून अहिल्या मेली, आणि तूं आहेस तो खंडूच मी समजतों. माझी कींव येऊं दे. अशी निष्ठुर होऊं नको." तेव्हां अहिल्याबाईला सासऱ्याचें बोलणें मोडतां येईना. तिला मालेराव नांवाचा मुलगा आणि मंचाबाई ह्मणून कन्या अशीं दोन मुलें होतीं. तेव्हां सासऱ्याचा शब्द मोडून आणि मुलांस परदेशी करून तिला जातां येईना. दुःखाचा डोंगर अंगावर कोसळला तो तिनें सासऱ्याच्या मर्जीखातर अगदीं निमूटपणें सहन केला. सती जाण्याचा तिचा निर्धार मल्हाररावापुढें चालेना, तेव्हां वैधव्यांतच आपला अवशिष्ट आयुर्भाग खर्च करण्याचा तिनें निश्चय केला, हें कांहीं निराळें सांगण्याची गरज नाहीं; असो. अशा प्रकारें अहिल्याबाईवर प्रथमतःच दुःखाचा अति असह्य असा चरका बसला. त्या दुःखाची विस्मृति मरे तोंपर्यंत होण्यासारखी नव्हती. सौभाग्याची व तिची ताटातूट झाली. ईश्वरक्षोभ, त्याला आपण काय करणार! त्यानें ठेविलें तसें आपण राहिलें पाहिजे, असें समाधान करीत बिचारी काळ कंठूं लागली. पण ईश्वराला कोठें तिच्यावर एकच संकट लोटून स्वस्थ बसावयाचें होतें? तो चांगला हात धुवूनच अहिल्याबाईच्या पाठीस लागलेला. आणि खरेंच ह्मटलें असतां ईश्वरी मायेचा अति अद्भुत चमत्कार ह्मणतात तो हाच कीं, तो दयानिधि, मनुष्यमात्रावर संकटांमागून संकटें लोटीत व दुःखसागरांत गटंकळ्यांवर गटंकळ्या मारावयास लावीत मग त्याच्या

आंगचें तेज फांकावयास लावितो; आणि असें हरहम्मेश घडतें. ह्मणूनच तर संकटांत किंचित् धीर व आशा मनुष्याला सुटते. अहिल्याबाईचीच गोष्ट कां होईना. तिच्यावर दुःखाची ह्मणजे अगदीं कडेलोट होऊन गेली. आणि होऊन गेली हेंच चांगलें झालें. तसें होतें ना ह्मणजे त्या साध्वीच्या अनेक गुणसौरभानें अद्यापपर्यंत अखिल सृष्टि डुलत राहिली नसती. तिच्या गुणप्रभावाचें तेज फांकून आह्मां तिच्या देश व धर्मबंधूंचे अद्यापपर्यंत डोळे दिपले नसते. तेव्हां सारांश तो हाच कीं, ईश्वर जें जें कांहीं करितो तें तें सर्व मनुष्याच्या कल्याणाखातरच होय! आणि अति वाईट अशा दिसणाऱ्या स्थितींतही तो अलौकिक सुखाचा वारा घालून देह गार ठेवीत असतो. आह्मी मूढ माणसें. आह्मांला तितकें आकलन करण्याची शक्ति नाहीं. धैर्याचा पाठिंबाही बेताबाताचाच. त्यामुळें ऐन वेळीं ह्मणजे संकटप्रसंगीं गांगरून देवाच्या नांवानें खडे फोडूं लागतों. जगन्नायक व जगत्पिता परमेश्वर याच्या अतर्क्य महिम्याचें भान राहत नाहीं इतकेंच!

अहिल्याबाईचा पति हयात असता, ह्मणजे ईश्वरानें त्या साध्वीला वैधव्य दिलें नसतें, व अहेवपणेंच ती वारती तर आमच्या देशांतील अमोलिक रत्न असें अहिल्याबाईकडे कदापि कोणासहि बोट दाखवितां आलें नसतें. साऱ्या जगांत अगदीं अपूर्व असें शहाजोग स्त्रीरत्न आमच्या मंडळांत पैदा झालें ह्मणून कोरडा गर्व वाहण्याचीही आमची पुण्याई पदरीं राहती ना. साधारण यःकश्चित् स्त्री शूद्रजातींतली, धनगराच्या कुळांतली, आणि देवी या सार्थ नांवास अगदीं पूर्णपणें पात्र असें साऱ्या दिनदुनयेस प्रत्यक्ष दुस्मनास कबूल करण्याला लावण्याइतक्या योग्यतेची आमच्या मंडळांत होऊन गेली असें ह्मणण्याचा प्रसंग

महाराष्ट्रीयांस येता ना. महाराष्ट्र कविमुगुटमणि मयूरहि "देवि अहिल्याबाई, झालीस जगत्रयांत तूं धन्या; ॥ न न्यायधर्मेनिरता अन्या कलिमाजिं ऐकिली कन्या ॥ १ ॥" असें स्तोत्र गात "श्रीविष्णुपदा-स्तविली त्वद्भक्ता हें तुलाहि मानावें ॥ विश्व जिला वानितसे कां न मयूरेंहि तीस वानावें ॥ १ ॥" अशी आपल्या मनाची समजूत करी, असलें अति दैदीप्यमान् स्त्रीरत्न आह्मांस लाधावें एवढ्याचसाठीं ईश्वरानें कारुणिक दयाधनानें तिच्यावर असलाले दुःखाचे पर्वत ढकलले असें आतां ह्मणण्यास तरी निदान कांहींएक प्रत्यवाय नाहीं! "खुदाकि खुदरत खुदाहि जाने, तूं क्या जाने बोल दिवाने," हेंच एकंदरींत अगदीं खरें असें मान्य करणें भाग पडतें!

३ पुत्रशोकः—पतिनिधनदुःखाचा मारा कसा तरी अहिल्याबाई सहन करिते न करिते, तोंच तिजवर सासऱ्याच्या मृत्यूचा घाला आला. त्यांतून सांवरते, इतक्यांत पुत्रशोकाचें दुःख तिच्यापुढें आलें (इ० स० १७५७). मालोजीराव अहिल्येचा पुत्र एकुलता एक. तोही बापाच्या पश्चात् सुमारें दोन अडीच वर्षांनीं वारला. या मुलापासून अहिल्याबाईस सुख हें कसें तें वाटलेंच नाहीं; कारण तो मूर्ख, गचाळ, आयदी आणि दुष्ट असे. पेशव्यांनीं त्याला युवसुभेदार ह्मणून वस्त्रें दिलीं खरीं. पण तो आजाच्या मागें दौलत चालविण्यास अगदीं नालायक असें पुष्कळांस वाटे. त्यानें अखेर अखेर तर आपल्या मूर्खपणाची व दुष्टाईची कमालच केली. अहिल्याबाई धर्मशील व परोपकारेंतत्पर असे. देवब्राह्मणांवर तिची अत्यंत निष्ठा आणि या चिरंजीवानें हरदम ब्राह्मणांचा सारखा छळ करीत असावें. धोतरजोडे, शाली, पागोटीं, ब्राह्मणांस दान देतों ह्मणून आणावीं

आणि त्यांत विंचू ठेवून तीं ब्राह्मणांस त्यानें द्यावीत. विंचवांनीं नांग्या मारल्यानें ब्राह्मणांस होत असलेल्या वेदना पाहून मग यानें खदखदां हांसत सुटावें. रुपयांनीं पात्रें भरून ती दक्षणा घ्या असें मालेरावानें ब्राह्मणांस ह्मणावें. ब्राह्मण आशाभूतच. त्यांनीं दक्षणा घेण्यास हात घातला कीं आधींच घालून ठेविलेल्या विंचवांनीं त्या ब्राह्मणांस दंश करावा. अशा प्रकारची अत्यंत व्रात्य प्रकृति मालोजीरावाची असे. अहिल्याबाईला साऱ्या त्रैलोक्याचा कळवळा आणि तिच्या पोटीं जन्मास आलेल्या या मालेरावबाबाची वृत्ति तो अशा प्रकारची. ह्मणजे या मुलापासून आईला कांहीं काडीमात्रही सुख झालें नाहीं, हें उघड आहे. परंतु ईश्वरी कृपेनें तो मुलगाही जास्त वर्षें जगला नाहीं. त्यानें आपला कारभार लौकरच आटोपला. ह्मणजे मालेरावास अहिल्याबाईच्या देखत देवाज्ञा झाली. मालोजीरावाच्या या मरणासंबंधानें लोकांत एक अशी समज आहे कीं, अहिल्याबाईनें या आपल्या पुत्रास मुद्दाम हत्तीच्या पायांखालीं देऊन मारविलें ! पण ही निव्वळ गप्प आहे. अहिल्याबाईची भिक्षुकांवर केवढी निष्ठा हें दाखविण्यासाठीं त्यांच्याच खाकेंतील ही गप्प आहे. मालेरावाच्या मरणासंबंधानें लोकवार्ता अगदीं खोटी अशी मध्यप्रांतचे इतिहासकार सर माल्कम छातीस हात लावून सांगतात. माल्कम साहेबांचा याविषयींचा लेख येथें दाखल केल्यानें आपणांस आणखी निराळीं कारणें देत बसण्याची गरज नाहीं असें वाटणें साहजिक आहे. माल्कम साहेब ह्मणतात, “मालेरावाच्या मरणाचा अपवाद कित्येक युरोपियन लोकांस कळला व तो त्यांनीं खरा मानिला. अहिल्याबाईच्या नांवाकरितां या गोष्टीची होईल तितकी मला बारीक चौकशी करणें भाग आहे असें वाटून मीं चौकशी केली. अखेरीस माझी अशी खात्री

झाली कीं, अहिल्याबाई पूर्ण निर्दोषी आहे. हा गुन्हा जर तिजकडून घडला असता तर कसेंही कारण असतें तरी ती क्षमेस पात्र राहिली नसती. आतां यांत संशय नाहीं कीं, वेडेपणांत मालेराव दुष्ट कृत्यें करी, तीं पाहून तिच्या अंगावर शहारा उठे. व तो चांगला होईल अशी आशाही नव्हती. यामुळें त्यास मरण आलें, ही गोष्ट खुद्द त्याजकडे पाहिलें तरी अथवा आपल्याकडे पाहिलें तरी किंवा देशाकडे पाहिलें तरी सर्वांशीं बरी झाली असें ती मानी. हें तिचें मानणें तिच्या गुणांस कलंक आणीत नाहीं, पण उलटें तिची योग्यता वाढवितें." साहेबांची ही अशी साक्ष झाल्यावर दुसऱ्या पुराव्याचें कांहीं कारण राहिलें नाहीं.

आतां मालेराव मेला त्याचें भोळसर माणसांस मात्र खरें वाटणारें एक कारण आहे. राजवाड्यांत एक दासी होती. तिचा, गांवच्या एका पटवेगाराशीं संबंध आहे अशी गुणगुण मालेरावाच्या कानावर आली. मालेरावच तो, त्यानें त्याला बोलावूं पाठविलें आणि लगेच त्याला देहांत प्रायश्चित्त दिलें. तो चेटुक जाणणारा होता व मरतांना त्यानें नानाप्रकारें मालेरावाची विनंती केली. मी निरपराधी आहें, माझें शासन करूं नका, असें सांगितलें तरी कांहींएक चालेना. शेवटीं मी मेलों तर पिशाच होऊन तुझा सडकून सूड घेईन अशीही त्या पटवेगारानें धमक दिली; पण मालेरावापुढें कांहींएक चाललें नाहीं. शेवटीं त्याला ठार मारलेंच. इतक्यांत तो गृहस्थ अगदीं निरपराधी असें मालेरावास कळलें, आणि आपण केलेल्या कृत्याचा त्याला उप्पाटून पश्चात्ताप झाला. पण उपयोग काय? त्या पश्चात्तापाच्या झटक्यांतच मालेरावाच्या अंगांत ज्वर भरला, आणि लगेच लोकांची समजूत झाली कीं पटवेगार पिशाच होऊन माले-

रावाच्या पाठीस लागला ! अहिल्याबाईचीही समजूत तशीच असेल तर त्यांत विशेष नवल कांहीं नाहीं ! त्या साध्वीनें आपल्या दुखणाईत मुलाच्या अंथरुणाशेजारीं डोळ्यांतलीं आसवें गाळीत सारखें खिन्नांतःकरणानें बसावें. अंगांत संचार केला ह्मणून तिची समजूत असे. त्या भूताची तिनें बहुतप्रकारें विनवणी करावी, कीं तुला अमुक देईन, तुझें तमुक चालवीन, पण माझ्या मुलाला एकदांचा सोड. ज्वराच्या तलखेंत मालेरावबाबा बडबडे तेंही "निरपराधी असतां यानें मला मारिलें. मी जिवास जीव घेईन" असेंच असे, त्यामुळें अहिल्याबाईची खात्री होई कीं हें पिशाच आहे. ह्मणून त्या पिशाचाची ती फारफारच विनवणी करूं लागली. पण ईश्वराला कांहीं तिची करुणा आली नाहीं ! रात्रंदिवस अलोचन जागरण करीत आणि पोटांतलें दुःख डोळ्यांवाटच्या पाण्यानें बाहेर ढकलीत ती साध्वी आपल्या मुलाच्या बिछान्याशेजारीं एकसारखी परमेश्वराची करुणा भाकीत बसली होती. पण तिच्या नशीबीं पुत्रशोक ठेवलेलाच तो कांहीं कुठें चुकावयाचा आहे ? अखेर मालेरावबाबा त्याच दुखण्यानें वारले. अहिल्यादेवीला पुत्रशोक झाला. मल्हार-रावाची औरस संतति खुंटली ! ईश्वरी इच्छा खरी, त्याला कोण काय करणार ?

ग्रंथ संग्रहालय

पण या मालेरावाच्या मृत्यूपासून कायकाय चांगले परिणाम घडले हें मालकम साहेब आपल्या इतिहासांत सांगतात. "आपल्या कुळाची चलती नाहींशी होऊं नये याकरितां पुढाकार घेणें अहिल्याबाईला भाग पडलें. तो पुढाकार घेऊन तिनें स्त्रीजन्म असतां असें शहाणपण, असे सद्गुण, व अशी कर्तृत्वशक्ति आपल्या अंगीं दाखविली कीं, त्या योगानें जिवांतजीव होता तोंपर्यंत आपल्या मुलखास ती सुखाची खाणच झाली होती" आणि

**मालोजीबुवा** जीवंत असते किंवा कर्ते निपजले असते तर **अहिल्याबाईची** अशी दिगंतकीर्ति इतकीं शतकें दुमदुमली नसती !

४ राज्यकारभारांतील **ओनामाः--मल्हाररावाच्या** पश्चात् सुमारें पांच सहा महिन्यांच्या आंतच **मालेराव**बाबा वारले. तेव्हां आतां राज्याची मालकी कोणाकडे हा पहिला भानगडीचा प्रश्न उद्भवला. पेशवे होळकरांचे मालक. पण तेथें एका म्यानांत दोन समशेरी; **राघोबा** आणि **माधवराव. माधवराव** मोठा सरळ. भारी दिलदार आणि पोक्त, राजकार्यधुरंधर व मातबर रणशौर्यशाली. **राघोबा** सर्व गोष्टींनीं बहुतेक चांगला असे; पण भलत्याच गोष्टीच्या नादीं भरून वांकडें तिकडें कांहीं तरी तो करीत असे. **मालेराव** वारले तेव्हां होळकरांचे दिवाण **गंगाधर यशवंत** कदीमपासूनचे कारभारी यांनीं **अहिल्याबाईस** अशी सल्ला दिली कीं आपल्या गोत्रजांपैकीं कोणी लहान मूल पाहून त्याला दत्तक घ्या. त्याच्या नांवानें आह्मी राज्यकारभार चालवूं. तुह्मीं एकादा परगणा खर्चाकरितां तोडून घ्या आणि स्वस्थ बसा. राज्यकारभार बायकांच्या हातून कधीं सुरळीत चालावयाचा नाहीं ! ही आपल्या कारभाऱ्याची सल्ला **अहिल्याबाईच्या** मनास आली नाहीं. तिनें आपणांस असें कर्तव्य नाहीं, असें स्पष्ट **गंगाधरपंतास** सांगितलें. जातीची स्त्री असून आपल्या बुद्धीप्रमाणेंच वागण्याचा तिचा इतका हट्ट आहे तर तिची परभारेंच फजिती करून तोंडास पानें पुसावीं असा घांट या निमकहराम **गंगाधर** मुत्सद्यानें घातला. **राघोबा** पेशव्याला पत्र **गंगाधरपंतानें** लिहिलें, आणि होळकराची दौलत अनायासें बेवारसा झाली ती घशाखालीं उतरवावी अशी सल्ला **गंगाधरपंतानें** दिली. **राघोबा** काय दादाच. त्यांना राज्याधिकाराची यावेळीं हांव सुटलेली. पुण्यास पुतणे डाळ शिजूं देत नाहींत, तेव्हां माळवा अ-

नायासें मिळतो तर तिकडे जावें हा त्यांचा निश्चय. आणि **गंगाधर यशवंत** कुलकारभारी आंतून फितूर. तेव्हां कार्यभाग झालाच, या डौलानें **राघोबा** माळव्याकडे लष्कर घेऊन जावयास सिद्ध झाले! "ब्राह्मण हरामखोरीस आला" हें वर्तमान **अहिल्याबाईस** कळलें तेव्हां तिनें आपलें "दुःखाचें गांठोडें" एकीकडे बांधून ठेवून **भोसले, गायकवाड, दाभाडे** इत्यादि तमाम मराठे सरदारमंडळाला गुप्तपत्रें लिहिलीं कीं "कैलासवासी सुभेदार यांनीं श्रीमंतांचे दौलतीचा पाया खोदून वीट आपले हातें टाकून इमारत उभी केली. त्यास या प्रसंगीं आह्मावरी ईश्वरी गजब. तेपक्षीं दौलत जगवून आह्मांस हमराई करून सेवाचाकरी घ्यावी तें एकीकडे राहोन दौलतीविषयीं पापबुद्धि धरिली आहे. त्यास आमचें जसें असेल तसें आह्मीं भोगूं. परंतु आज आह्मांवरी उद्यां तुह्मांवरी हीच गोष्ट आहे याचा विचार करून फौज मदतीस पाठवावी." **मल्हाररावाचा** स्नेह बहुतेकांशीं. त्याच्या सुनेनें आपणावरील कठीण प्रसंग जाणून कुमकेचीं पत्रें जासूदाकरवीं पाठविलेलीं, तेव्हां तिकडे कानडोळा कोण करणार? ज्यांला ज्यांला कुमकेचीं पत्रें गेलीं त्या सर्वांनीं फौज पाठवून प्रसंग पडल्यास स्वतः येऊं अशीं अभिवचनें आणखी वर दिलीं. झालेल्या वर्तमानाचीं पत्रें खुद्द **माधवराव** पेशव्यासही **अहिल्याबाईनें** पाठविलीं. त्याचें उत्तर आलें कीं "तुमच्या दौलतीविषयीं जो पापबुद्धि ठेवील त्याचें पारिपत्य बेलाशक करावें" आणि खुद्द **अहिल्याबाईनें** जरब बसे असें भरदरबारांत भाषण केलें कीं "मी बायको असें मानूं नका. खांद्यावर बांसडा टाकून उभी राहीन तेव्हां श्रीमंताचे दौलतीस अवघड पडेल. आमचे वडिलांनीं, भाडभवई (नाचेपणा) करून दौलत मिळविली नाहीं, तर तरवारीचे अनुमानानें शरीर खर्चीं

घातलें आहे. आह्मीं शिलेदार वडिलांचे चाकरीप्रमाणें चाकरी घेतल्यास हजर आहोंत.–ब्राह्मण ह्मणतील दौलतीचा अभिलाष करूं हें होणार नाहीं.'' खरेंच या भाषणांत **अहिल्यादेवीच्या** उग्र व तेजस्वी क्षात्रतेजाची चमक भरपूर मारत आहे. हीं भाषणें कर्णोपकर्णीं **राघोबाच्याही** कानावर गेलीं. **मालेरावाची** आई, **खंडेरावाची** बायको, अशा दोन नात्यांनीं मी दौलतीची मालकीण. यांत ढवळाढवळ करण्याचा कोणालाच अधिकार नाहीं. मला वाटेल तशी व्यवस्था करणार, हा आग्रह **अहिल्याबाईचा**, आणि तो **श्रीमंत माधवरावाला** अगदीं मान्य असे. **राघोबाच्या** मनांत मात्र तेवढी अभिलाषबुद्धि व त्याला फितूर **गंगाधर यशवंत** दिवाण !

इकडे **राघोबा**, बरोबर पन्नास हजार सैन्य घेऊन माळवा प्रांतावर चाल करून येऊं लागले. **माल्कम साहेब** ह्मणतात, **राघोबाला अहिल्याबाईनें** निरोप पाठविला, व अंतःकरणापासून उपदेश केला "स्त्रीबरोबर लढूं नका. त्यांत तुमच्या नांवास व्यर्थ बट्टा लागेल. मींही तुमच्यापाशीं लढण्याची तयारी चालविली आहे. त्यांत दुर्दैवानें तुमचा पराभव झाल्यास नाहक तुमच्या नांवाची अपकीर्ति होईल.'' आपण सर्व लढाईची तयारी करून सज्ज उभी राहिली. होळकराच्या कैफियतींत या प्रसंगाचें कथन अगदीं निराळ्याच प्रकारें केलें आहे. **राघोबा** सैन्यानिशीं येऊं लागला तेव्हां पुत्र मानलेल्या **तुकोजीनें** त्याला निरोप पाठविला कीं **क्षिप्रा** उतरतांच तुमची आमची तरवार चालेल. इतक्यांत इकडे आपण उद्युक्त झालेलें कार्य यश मिळूं देत नाहीं, असें पाहून **राघोबाचेही** डोळे या वेळीं चांगले उघडले. ह्मणून **तुकोजीच्या** निरोपास **राघोबानें** जाबसाल पाठविला, '**मालेरावबाबा** वारले सबब **अहिल्याबाईच्या** समाचारास ह्मणून आह्मी येत

असतां तुह्मीं असा निरोप काय ह्मणोन पाठविला?' "मातंगपोशीस" यावयाचें तर बरोबर सैन्य कशास पाहिजे? "आमचें लष्कर तें तुमचें नव्हे कीं काय" असा दुसरा निरोप तुकोजीनें पाठवितांच राघोबा सडा इंदुरास गेला व तेथें अहिल्याबाईचीं आणि राघोबाचीं राज्यकारभारसंबंधीं बहुत बोलणींचालणीं झालीं, आणि उभयतांच्या मनांतील तेढीं नाहींशीं झालीं. हा बखरकारांचा वृत्तांत, तेव्हां खरा कोणता हा प्रश्न राहिला. अहिल्याबाईचें चरित्र लिहितांना माल्कम साहेबांनीं आपल्या वाचकांस असें सांगितलें आहे कीं "अहिल्याबाईविषयीं माहिती सांगण्यांत होळकराच्या कुळाचे नातेवाईक व अनुयायी लोक हे पक्षपात करतील असें समजून व तिच्या कारकीर्दींतील ज्या बारीक गोष्टी आपण बहुधा ऐकतों त्यांपासून मनावर खोटा ठसा न व्हावा असें मनांत आणून मीं अवांतर लोकांकडूनही हकीकती मिळविल्या." इतक्या हुषारीनें माहिती संपादन केलेले इतिहासकार अशा प्रकरणीं चुकतील हें शक्य नव्हे. आपला अर्थाअर्थीं बिलकुल संबंध नाहीं अशा लेखांत किंवा भाषणांत इंग्रज कडक सत्यभोक्ते असतात. त्यांचा अति दूर असा बादरायणसंबंध आला कीं मात्र त्यांच्यासारखे पक्षपाती व सत्यापलापी त्यांचे तेच. प्रख्यात अमेरिकन ग्रंथकार वाशिंग्टन आयरव्हिंग यांचा अभिप्राय इंग्रज ग्रंथकारांसंबंधानें अगदीं हुबेहुब असाच आहे ह्मणण्यापेक्षां त्यांच्या मताचेंच हें भाषांतर असें ह्मटल्यास शोभणार आहे. ह्मणजे मुख्य सारांश माल्कम साहेब ह्मणतात तोच प्रकार खरा असें मानणें जास्त सयुक्तिक आहे.

अशा प्रकारें अहिल्याबाईनें आपल्या राज्यांत शांतता बसविली आणि राघोबासारख्या भरारी शूरास जागच्या जागींच चुप बसावयास लाविलें. या एका गोष्टीवरूनसुद्धां तिच्या आंगच्या

तेजस्वीपणाची आणि उग्र जरबेची बरीच खात्री होण्यासारखी आहे. संकटांत स्वतः सांपडलेली, शोकांत चूर झालेली, नवरा, सासरा, लेंक यांच्या मृत्यूमुळें अनाथ व परदेशी झालेली अहिल्याबाई सान्या दुःखांस आणि संकटांस गुंडाळून ठेवून शूरमर्दाप्रमाणें धैर्यानें आणि उत्साहबुद्धिपूर्वक आलेल्या व येऊं घातलेल्या प्रसंगांस शिंगांवर घेण्यास सरसावते, तेव्हां तिच्या कोणकोणत्या ह्मणून गुणांची तारीफ करावी हें समजत नाहीं. मर्दासारखे मर्द असलेल्यांची या अशा प्रसंगीं खचीत कंबर खचली असती! पण अहिल्याबाईनें त्या प्रसंगाला तो अशा धैर्याचा अवलंब करीत त्याला मागें हुसकून लाविलें! धन्य त्या माउलीची, हेंच खरें.

५ **पुढील व्यवस्थाः**—आपल्या गादीची मालकी व राज्यकारभार चालविण्याचा सर्व अधिकार **अहिल्याबाईनें** सर्वस्वीं आपल्या स्वाधीन करून घेतला. **अहिल्याबाई** इ० स० १७६५ पासून १७९५पर्यंत राज्यकारभार पाहत होती हें तर स्पष्ट आहेच. पण लष्करी कामांत तिच्यानें पुढाकार घेववला नसता ही गोष्ट अगदीं निर्विवाद होय. **तुकोजी** होळकर ह्मणून एक अगदीं दूरचा आप्तसंबंधी होता त्यालाच **अहिल्याबाईनें** आपल्या जवळ केलें. मोहिमा, मुलुखगिऱ्या इत्यादि सरदारीपेशाचीं कामें त्या **तुकोजीरावाकडे अहिल्याबाईनें** सोंपविलीं होतीं. **तुकोजीराव** चांगला शूर आणि तेजस्वी मराठी सरदार असे. लष्करी बाण्यांत पटाईत, तसाच वर्तनांतही फार सीधा आणि पापभीरु, **तुकोजीराव** होळकर असे. **अहिल्याबाईस** तो आई मानी आणि त्याप्रमाणें निःसीम मातृसेवकांसारखी त्याची अगदीं निर्दोष व निष्कलंक अशी वर्तणूक **अहिल्याबाईशीं** होती. **तुकोजी अहिल्याबाईपेक्षां** वयानें मोठा होता आणि **मल्हाररावसुत तुकोजी**

होळकर असें नांव त्यानें आपल्या शिक्क्यावर खोदिलें होतें. अहिल्याबाईनें अंतस्थ राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं ठेवून एकंदर व्यवस्था ती जातीनें पाही, आणि बाहेरील व लष्करी पेशाचा सर्व कारभार तिनें **तुकोजी**कडे सोंपविला अशी व्यवस्था पुरीं तीसएक वर्षे चालली होती, पण तेवढ्या अवधींत दोन कारभारामुळें साहजिक उत्पन्न होणारी अव्यवस्था किंवा परस्परांमध्यें मनोविकारजन्य स्पर्धा अगर गैरवांका वर्तन असें कधींच कोणतें घडलें नाहीं. यावरून उभयतांच्या शुद्ध व पोक्त स्वभावांची ओळख अनायासें होणार आहे. **अहिल्याबाई**च्या जिवांत जीव असे तोंपर्यंत एक दिवशींसुद्धां त्या माउलीचा राग आपणांवर होईल असें वर्तन **तुकोजी**च्या हातून घडलें नाहीं. **अहिल्याबाई**सारखी समंजस, शहाणी, स्वधर्मनिष्ठ आणि सद्गुणांची खाण अशा स्त्रीशीं **तुकोजी**रावाचें वर्तन इतकें शुद्ध, स्वच्छ आणि सरळ होतें यांत त्याचाही चांगुलपणा कांहीं कमी व्यक्त होत नाहीं! अस्तु अहिल्याबाईच्या कारकीर्दीचें आपणांस जास्त वर्णन प्रस्तुत स्थळीं कर्तव्य नाहीं.[१] तिच्या संबंधाचेंच आपणांस आज लिहावयाचें आहे तेव्हां तो मार्ग स्वीकारावा हें रास्त आहे.

**६ अहिल्याबाईची दिनचर्या:**—अहिल्याबाईची सर्व कामांत शिस्त आणि टापटीप उत्तमप्रकारची असे. अनियमितपणा हा तिला फारसा शिवला नाहीं. सूर्योदयापूर्वीं एक तास ती

---

१. मराठे सरदार २ होळकर या पुस्तकांत **अहिल्याबाई**च्या कारकीर्दीचें सविस्तर वर्णन आढळेल. येथें व्यक्तिसंबंधानेंच उल्लेख करणें विशेष इष्ट वाटतें आणि तेंच आवश्यक आहे. यास्तव राज्यकारकीर्दींतल्या अनेक गोष्टी कीं ज्यांचा वास्तविक संबंध **तुकोजी**रावाकडे जास्त येतो तो गाळणें यांत कांहीं गैर असेंही कोणास वाटणार नाहीं हें उघडें आहे.

**धनुर्धारी.**

जागी होई. उठून पूर्वकृत्य आटोपून स्नान करून ती पूजा-अर्चेंत वेळ घाली. पूजा संपतांच पुराणश्रवण चाले. नंतर दानधर्म करावा, व क्षुधितांस अन्न व ब्राह्मणभोजन घालून नंतर ती आपण जेवी. अहिल्याबाईला मांसान्न खाण्याची जातीसंबंधानें कांहीं हरकत नसे, पण ती कधीं त्याला आजन्मांत शिवली नाहीं. भोजनोत्तर वामकुक्षी आणि नंतर दोन वाजण्याच्या सुमारास पोषाख करून दरबारांत जाई. तेथें न्यायमनसुबा, वसुलहिशेब इत्यादि कामें अति दक्षतेनें ती स्वतः पाहून व्यवस्था करी. अस्तमानीं दरबार खलास झाल्यावर ती घरीं जाऊन पुनः पूजाअर्चेंत वेळ घाली. रात्रीं सुमारें तीन तास दरबारचें शिल्लक असलेल्या कामाचा निकाल करून अकरा वाजण्याच्या सुमारास ती निद्रा घेई. असा क्रम तिचा अबाधित चालला असे. सणवार, उपास, व्रतवैकल्यें इत्यादि सर्व यथासांग एकाद्या अति कर्मठ ब्राह्मणस्त्रीप्रमाणें ती पाळीत असे. तिचा पोषाख अति साधा, वैधव्यस्थितीला साजे असा होता. वयाच्या तिसाव्या वर्षापासून तों साठाव्या वर्षापर्यंत ह्मणजे अंतकालपर्यंत तिची ही दिनचर्या सारखी अबाधित चालली होती. त्यांत अंतर ह्मणून कसें तें नव्हतें. एकादा मोठा सण किंवा महत्वाची तीथ असली ह्मणजे मात्र तिचा सारा वेळ तत्प्रीत्यर्थ जाई.

७ तिची धर्मबुद्धिः—अहिल्याबाईची साऱ्या त्रैलोक्यभर कीर्ति झालेली आहे व तिचें नांव ऐकूनही माहीत नाहीं असा एकही हिंदु आढळणें नाहीं; तिच्या नांवाचा उच्चार ऐकतांच आनंद वाटून तिला आशीर्वाद देण्याची बुद्धि प्राणिमात्रास अगदीं साहजिकपणें उपजते; मनुष्य, शूद्र, धनगरस्त्री असतां देवी या नांवानें संबोधिलें तरी तिची खरी योग्यता अपुरीच, असें वाटतें; याचें कारण त्या साध्वीची धर्मबुद्धि होय! अहिल्याबाई होळक-

रीण इची स्तुति करणें हें पावनकारक आहे, तिच्या स्मरणानें आपलीं पापें दग्ध होतील, अशी समजूत अद्यापपर्यंत आहे याचें कारण तिची धर्मबुद्धि. हिमालय पर्वताच्या पायथ्यापासून तों रामेश्वराच्या टोंकापर्यंत तिचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य, पुरुष, स्त्री व मूल मिळणें आजला, (स० १८९५) तिला स्वर्गवासी होऊन बरोबर शंभर वर्षें होऊन गेलीं तरी, कठीण आहे. इतकी शाश्वत आणि खरी कीर्ति त्या साध्वीची झाली याला कारण तिची धर्मबुद्धि. आमच्या देशांत धार्मिक व उदार पुरुष पुष्कळ शेंकडों होऊन गेले, पण अहिल्याबाईइतकी खरी अजरामर कीर्ति त्यांच्या नशीबीं आलीच नाहीं. अहिल्याबाईच्या नांवाचें नित्य आठवण होई असें कांहीं जेथें कृत्य नाहीं असें एकही पवित्र क्षेत्र, प्रसिद्ध देवस्थान या साऱ्या भरतखंडांत नाहीं. भरतखंड ह्मणजे पवित्रक्षेत्रांचें आणि पुण्यतीर्थांचें माहेर. तेतिसकोटि देवतांचे पूजक हिंदु आणि तितक्या ठिकाणीं अहिल्याबाईच्या देणगीचा विस्तार. तेव्हां तिची अशी कीर्ति झाली यांत नवल कोणतें? नवीन देवळें बांधणें, जीर्णोद्धार, नंदादीपाचें तेल, एखादे वेळचा दिवसाचा किंवा वाराचा नैवेद्य, अन्नसत्र, गंगोदकाचा अभिषेक, असें एकनाएक तरी प्रत्येक पवित्र ठिकाणीं आजमितीला अगदीं अबाधित असें जणों काय कालच व्यवस्था झाली इतक्या दक्षतेनें चाललें आहे. मल्हारराव वारले त्या वेळीं सुमारें चार एक कोटींची शिल्लक होती ती आणि जातखर्चाकरितां चार लाखांचा मुलूख होता, त्याचा तिनें या धर्माच्या कामीं व्यवस्थितपणानें व टापटिपीनें खर्च केला. आह्मां लोकांची धर्मादायपद्धति पाहून, त्यांत अमुक आहे तमुक नाहीं असें नांव ठेवीत नाक मुरडणारे इतकेंच नव्हे, तर असें करण्यानें पाप मात्र जास्त लागतें, असे युरोपियन मिशनरीगुरु व

त्यांचे बगलबच्चे व त्यांस सर्वस्व समजणारे सुधारक प्रतिपादित असतात. पण खुद्द माल्कम साहेब स्पष्ट ह्मणतात कीं "तिच्या एकंदर दानधर्मांत व कारखान्यांत असा सर्वत्र भूतभक्तीचा अंकुर दिसून येतो कीं त्यांत खऱ्या शहाणपणाचें व लोकोपकाराचें स्वरूप आहे." याच्यापेक्षां दुसऱ्या "सर्टिफिकिटा"ची आतां कांहीं आवश्यकता नाहीं. धर्मांत ढोंग असतें व ज्याचा तिटकारा प्राणिमात्राला येणें साहजिक आहे त्याचा विटाळसुद्धां कधीं अहिल्याबाईच्या वर्तनास झाला नाहीं ही खात्री माल्कम साहेब परभारें करितात. अहिल्याबाईचा धर्मादाय पुण्यक्षेत्रीं, देवस्थानांत आणि ब्राह्मणांसच फलद्रूप होई असें कांहीं नव्हतें. तिला त्रैलोक्याचा कळवळा असे. भूदेव ब्राह्मणांला तसेंच महारमांगादि अतिशूद्रांलाही ती अन्नसंतर्पण करी. रानांतील पशुपक्ष्यादिकांसही ती अन्नपाणी देई. शेतकरी लोक आपल्या धान्याची नासाडी होऊं नये ह्मणून पक्ष्यांस आपल्या शेतांत येऊं देत नाहींत, धोंडे मारून उडवितात, हें पाहून तिचा जीव तिळतिळ तुटे. गांवोगांव स्वतंत्र शेतें खरेदी करून तीं सर्व पक्ष्यांस खाण्यास सोडी! शेतकरी शेतांत बैलांकडून काबाडकष्ट घेतात, ते तानेले असतील तर त्यांना पिण्यास पाणी मध्यें आडतें थांबवून अहिल्याबाईचे नौकर पाजवीत. क्षुधितांस अन्न, तानेल्यांस पाणी, उघड्यांस वस्त्र इत्यादि पुरविण्याचें काम अहिल्याबाईचें अहर्निश चालू असे. खरी ती माउली धन्य खरी. भूतदया ज्याच्या अंगांत आहे तोच संत आणि तोंच देव असें तुकारामबुवांनीं ह्मटलें आहे, त्यावरून अहिल्याबाई होळकरीण खरी देवी ठरते. मनुष्य जन्मून देवाची योग्यता पावणें यापेक्षां जन्माचें दुसरें आणि खरें सार्थक अन्य कोणतें आहे? आणि अशांचा महिमा गाण्याची मनुष्यमात्रांत शक्ति ती कोठून येणार?

८ **तिची जरब:—अहिल्याबाई** पापभीरु, धर्मरत, ईश्वरसेवापरायण, महाधार्मिक आणि परमसद्गुणी, परमार्थचिंतनांत सदा दंग असे ह्मणून तिची जरब कांहीं कमी नव्हती. तिची न्यायबुद्धि व सत्यपरायणता अत्यंत उग्र असे. आपण न्यायी, आपल्या राज्यांत नीति आहे, आपण न्यायानें आणि नीतीनें राज्यकारभार करूं, असे तिनें जाहीरनामे लाविले नव्हते; अशा अर्थाचीं गुळचट दरबारभाषणें केलीं नव्हतीं, किंवा कांहीं नाहीं. आपल्या पदरच्या नौकरानें कधीं कोणतें अनुचित कर्म केलें तर त्याला ती घोर शासन करी. तिला मग दयामाया येत नसे. नर्मदेच्या तीरावरील गोंडलोकांनीं दंडेलगिरी आरंभिली. त्यांला सामोपचारानें समजावून तिनें पुष्कळ सांगितलें तरी ते ऐकेनात असें पहातांच त्यांत पुष्कळ अति दुष्ट लोकांस तिनें भराभर फांशीं चढविलें. निर्वाहास कांहीं मिळत नाहीं एवढ्याचखातर लुटालूट करणाऱ्यांस ती उपजीविकेचीं साधनें करून देई, व त्यांच्याशीं ममतेनें वागे. ही पडीत जमीन आहे ती घ्या, वाहीत करा, आणि दंगेधोपे होऊं देणार नाहीं असा त्यांच्याकडून ती करार लिहून घेई, आणि मग त्यांत जर का अंतर पडलें तर त्यांचें चांगलें शासन करण्यास ती मागेंपुढें पहात नसे. यामुळें तिची दहशत फार असे. प्रत्यक्ष **तुकोजी** इंदुरास सैन्यासुद्धां असतां कांहीं अगदीं क्षुल्लक अशी अन्यायाची गोष्ट त्याच्या हातून घडल्याचें वर्तमान **अहिल्याबाईच्या** कानावर गेलें, व तें खरेंखोटें याची शहानिशा करून खरें असें तिला कळतांच तूं इंदुरीं राहूं नको, दूर कोठें तरी उतर. माझ्या शहराला त्रास होतो. असा त्याला तिनें निरोप पाठविला. तो ऐकतांच **तुकोजीनें** तेथून आपला तळ हालविला, आणि अपराधाची क्षमा करा असें त्यानें

---

१. **तुकोजी**च्या हातून घडला तो अन्याय हा:—**देवीचंद** म्हणून

**अहिल्याबाईस** विनविलें. इतकी कदर तिची असे. **अहिल्याबाईला** दरसाल करभार पोंचविणारे लहानमोठे पुष्कळ संस्थानिक होते. पण राज्यावर एक बाई रंडकी आहे, तिच्याशीं आपण सलोख्यानें कां वागावें, खंडणी नाहीं वेळेवर दिली तर ती काय करणार, असा एक घटकाभर देखील कोणास विचार सुचला नाहीं. उदेपुरच्या उरशी राण्यानें मात्र रामपुरा बळकावण्याचा प्रयत्न करून त्यानें **अहिल्याबाईचा** उपदेश अमान्य केला एवढें कळलें मात्र, तों लगेच तिनें आपल्या **शरीफभाई** नामक पाहऱ्यावरील मुख्याधिकाऱ्यास सैन्य देऊन त्याच्यावर पाठविलें. **तुकोजीराव** त्या वेळीं दक्षिणेंत गुंतला होता त्याची वाटसुद्धां तिनें पाहिली नाहीं. शरीफभाईनें त्या राण्याचा पराभव केला, तेव्हां त्यानें **अहिल्याबाईशीं** तहाचें बोलणें लाविलें. तें तिनें मान्य केलें. **अहिल्याबाईची** कारकीर्द तीस वर्षेपर्यंत होती; पण तेवढ्या अवधींत तिच्याशीं कोणीही कटकटी केल्या नाहींत. परराज्यांत आणि स्वराज्यांत तिला अगदीं वचकून असत. **महादजी** शिंदा **अहिल्याबाईला** फार वचकून असे याचें कारण **माल्कम साहेब** ह्मण-

---

कोणी इंदुरांत एक सावकार असे. तो निपुत्रिक मेला. त्याची संपत्ति मोठी होती. त्याची दौलत सरकारांत जप्त करावी असा **तुकोजी**चा मनोदय. त्याप्रमाणें त्यानें केलें. हें वर्तमान **अहिल्याबाईस** कळलें तेव्हां तिनें त्याच्या बायकोस बोलावून तिच्या नवऱ्याची सर्व दौलत तिच्या स्वाधीन केली, आणि दत्तक घेऊन तूं आपल्या संपत्तीचा उपभोग घे असें **अहिल्याबाईनें** सांगितलें, आणि **तुकोजीरावास** इंदुरापासून दूर उतरा-असा निरोप पाठविला. दोस्त व तुमचें सहाय्य हरवक्त करूं असे करार लिहून द्यावे, आणि ऐन प्रसंगीं निपुत्रिक कां मेला? तुमचें आतां, आह्मी सर्वस्व घेणार, या राजनीतीचे सांप्रतचे सार्वभौम आणि जुन्या काळांतली अज्ञाणी, अशिक्षित, अक्षरशत्रु **अहिल्यादेवी** यांच्या वर्तनांत हें केवढें अंतर !!

तात त्याला तीस लाख रुपये अहिल्याबाईनें कर्जाऊ दिले होते. पण हें अगदीं शुष्क कारण होय. कारण महादजीला तीस लाख काय, तीस कोटि रुपये देणारे सावकार सहज भेटले असते! आमच्या राजेरजवाड्यांपैकीं बहुतेकांना खुद्द पेशव्यांनासुद्धां कर्ज असे, पण ते कधीं सावकाराच्या आहारीं नव्हते. इंग्रज दरसाल चार कोटि व्याज भरीत आहेत ते कधीं कोणाला वांकून आहेत काय? तें असो. शिंदेहोळकरांचे मुलूख एकमेकांत मिसळलेले. महादजी शिंदा मोठा फौजबंद आणि अति महत्वाकांक्षी तरी पण तोसुद्धां अहिल्याबाई हयात होती तोंपर्यंत एक दिवसही त्यांच्यांत धुसपुस झाली नाहीं. जसें काय एकच राज्य अशा सलोख्यानें वागत. आपल्या हाताखालील कामगारांच्या वर्तनावर सुद्धां तिचा भारी उग्र दरारा असे. खेमदास ह्मणून एक सावकार निपुत्रिक मरण पावला, त्याच्या बायकोपाशीं तेथील कमावीसदारानें लांचलुचपत मागितली व न दिल्यास तुमचा माल जप्त करीन अशी त्यानें खेमदासाच्या बायकोला धमकीही दिली. हें वर्तमान अहिल्याबाईला कळलें तेव्हां त्या बाबतींत पुरी चौकशी चालवून कमावीसदाराचा अन्याय आहे असें आढळून येतांच तिनें त्याला कामावरून बडतर्फ केलें, आणि खेमदासाच्या बायकोला दत्तक घेण्याची परवानगी देऊन तिला अहिल्याबाईनें आश्वासन देऊन आनंदानें राहण्यास सांगितलें. ह्मणजे अहिल्याबाई त्रैलोक्यकळवळ्याची, उदार, सद्धर्मशील स्त्री खरी, पण त्याबरोबरच तिच्या अंगीं न्यायाचें अत्युग्रतेज असे. या दोघांचा मिलाफ ह्मणजे स्वभावांतली खरी खुमारी. गंगोबातात्या मल्हारराव होळकरांपासूनचा कदीम कारभारी. त्यानें बेइमानगिरी अहिल्याबाईशीं करून राघोबांशीं फितूर मांडला, पण त्याच्या त्या सर्व अपराधांची तिनें क्षमा केली. त्याला मोठ्या अदबीनें वाग-

वीत असे, कारण आपल्या सासऱ्याच्या वेळीं त्यानें मोठमोठीं कामें अनेक केलेलीं तिला माहीत होतीं. गंगोबाला तिनें कामावरून दूर केलें खरें, पण इतमाममरातब चांगला ठेवी. अशी तिच्या स्वभावांत चांगुलपणाची इतकी उत्तम भेसळ होती!

९ **तिचा स्वभावः**—इतका वेळ हकीकत सादर केली त्यावरून तिच्या स्वभावाची साधारण माहिती झालीच असेल. पण एक दोन ठळक स्वभावांचें वर्णन करावयाचें राहिलें आहे तेवढें या ठिकाणीं करून या महासाध्वीचें अति पवित्र चरित्र समाप्त करावयाचें आहे. स्तुतीला भुलणें हा गुण बायकांत अति प्रमुखत्वेंकरून असतो. स्तुतीला भुलावयाचा नाहीं असा पुरुष आढळणें आधीं कठीण, मग बायकांची गोष्ट तर सांगावयास नको! अहिल्याबाईला तोंडपुजेपणाचा आणि स्तुतीचा अतिशय कंटाळा असे. एकदां एका कवीनें अहिल्याबाईचा एक स्तुतिपर ग्रंथ लिहून तो तिच्याकडे नेला, तेव्हां त्या साध्वीनें तो ग्रंथ नदींत बुडवून त्या पंडितास सांगितलें 'बाबा' मी यःकश्चित् माणूस माझी स्तुति करून तुला काय मिळणार आहे? ईश्वराची तरी करावयाची होतीस!' आणि त्या ब्राह्मणाला एक फुटकी कवडी देखील अहिल्याबाईनें दिली नाहीं. अहिल्यादेवी खरोखरच लोकोत्तर स्त्रीरत्न. ती माउली, महासाध्वी साक्षात् देवी. तिच्या अंगांत खरोखर दुर्गुणाचा लेश सुद्धां नव्हता. आणखी परक्यांचा अपहार आणि तो कोणत्याही प्रकारें तिला खपत नव्हता. तिच्यासारखी निरपेक्षबुद्धि अन्यत्र आढळणें महा दुर्घट होय! **तापीदास** व **बनारसदास** नामक दोघे बंधु खरगोण येथें धनाढ्य सावकार होते. ते उभयतांही निपुत्रिक एकामागून एक असे वारले. त्यांच्या जवळ रोख रुपये दोन लाख आणि लोकांकडून येणें दोन लाख अशी संपत्ति होती. तापी-

दासाची बायको महेश्वरीं अहिल्याबाईकडे येऊन ह्मणाली "सरकार माझ्या दिरानें आणि नवऱ्यानें मिळविलेली ही संपत्ति तुमच्याच राज्यांतली आणि तुमच्याच ममतेनें ती आह्मांजवळ राहिली आहे करितां मी ती दौलत आपल्या चरणीं अर्पण करितें, तिचा स्वीकार करावा. अहिल्याबाईनें त्या बाईला ह्मटलें, बाई, ही तुझ्या नवऱ्याची संपत्ति मला घेऊन काय करावयाचें आहे? ईश्वरानें दिलें इतकें मला पुरे आहे. तुझ्या संपत्तीची तूं मालकीण, ती, तुझी संपत्ति मला नको. तुलाही ती संपत्ति "नको असेल तर दानधर्म कर अथवा लोकांस उपयोग होईल व तुझ्या नवऱ्याचें नांव मागें राहील असें कांहीं काम बांध." आणि त्याप्रमाणें घांट व एक देऊळ तापीदासाचे बायकोनें बांधलें! अहिल्याबाईची ही निरपेक्षबुद्धि पाहून कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं! द्वापारयुगांत धर्मराजाच्या निस्पृहतेची एक गोष्ट सांगत असतात त्याच्यावर तान कलियुगांत अहिल्यादेवीनें केली यांत संशय नाहीं! बायकोची जात, धनगराचें कुळ, आणि केवढा हा अधिकार! कोण ही श्रेष्ठता! आणि कसली ही सदाचारसंपन्नता! असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं. तिच्या स्वभावांत शांतपणा व सौम्यता विशेष असे. तिला गर्व तो कधींच शिवला नाहीं. ढोंगाचा तिला विटाळ असे. असत्य भाषण करण्याचा तिला प्रसंग कधीं आला नाहीं. कृतघ्नतेची तिच्यावर सावलीसुद्धां कधीं पडली नाहीं. दुराचार असा तिला माहीतच नव्हता. काळाचा दुरुपयोग तिनें कधीं केला नाहीं! या साध्वीच्या कोणकोणत्या गुणांची स्तुति गावी हें प्रस्तुतच्या लेखकास कळत नाहीं. त्या महासाध्वीचें पुण्यशील व पावनकारक चरित्र यथास्थित गाण्याची करामत व शक्ति त्याच्या लेखणींत नाहीं हें तो निरभिमानतया कबूल करितो. सर्व सद्गुणांची

खाण अहिल्याबाई, साक्षात् देवीसारखी. तिची योग्यता आणि तिच्या त्या यशाचें यथास्थित गुणवर्णन करण्याचें सामर्थ्य साधारण लेखकांच्या लेखणींत कोठून यावें. अहिल्याबाईच्या सुस्वभावामुळें सारें आर्यावर्त कसें तिच्यापुढें नमो ह्मणून असे. तिचा मान कोणत्याप्रकारें होता, आणि तिची कीर्ति कशी दिगंत पसरली होती हें माल्कम साहेबाच्या इतिहासांतील खालील उताऱ्यांवरून व्यक्त होणार आहे. "मराठी राजेरजवाड्यांत तर तिच्याशीं ( अहिल्याबाईशीं ) वैर करणें अथवा तिच्या साहाय्यास न जाणें केवळ गोहत्येसारखें महापाप समजलें जाई" ह्मणजे देवी अहिल्याबाई अजातशत्रु होती. माल्कम साहेब आणखी ह्मणतात "सर्व लोक तिच्या ठिकाणीं सारखीच पूज्यबुद्धि ठेवीत. ज्या तऱ्हेनें पेशवे तिची योग्यता राखीत, त्याच तऱ्हेनें हैदराबादचा निजाम, ह्मैसूरचा टिप्पूसुलतान हेही ठेवीत. व हिंदूंप्रमाणेंच मुसलमानही ईश्वराचा स्तव करीत कीं अहिल्याबाईची भरभराट नित्य असो व ती दीर्घायु होवो"! याचें नांव जन्मास आल्याचें सार्थक. बायको आणि राजघराण्यांतली, ना वडील ना कोणी विचारता, संपत्ति अपार, अधिकार मोठा, तारुण्य ताजें आणि ही कीर्ति आणि असा लौकिक तेव्हां धन्य आहे त्या अहिल्यादेवीची व तिला प्रसवणाऱ्या तिच्या मातेची! अहिल्याबाईचे गुण साग्र वर्णन करण्याला सामर्थ्य एकाद्या सरस्वतीच्या अंगींच आढळावयाचें. इतरांना ती गोष्ट केवळ असाध्य यांत कांहींएक शंका नाहीं. मनुष्यमात्रांत स्वभावतः दुर्गुण असावयाचे ते देखील स्त्री असून तिच्यांत नव्हते. स्त्रीजातीला अगदीं स्वाभाविक "अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता" ह्या सुभाषितकाराच्या श्लोकाला अहिल्यादेवीनें हरताळ लाविला यांत कांहीं शंका नाहीं.

स्त्रीजातीस अगदीं साहजिक जो थाटमाटाचा डौल त्याचा-सुद्धां अहिल्यादेवीला तिट्कारा असे. अहिल्याबाई राणी खरी, पण साधें पांढरें पातळ त्याला कांठ किंवा जर नाहीं असेंच वस्त्र ती नेहमीं नेसत असे. दागिन्यांचा बायकांना फार सोस. पण अहिल्याबाई एक लहानसा कंठा मात्र गळ्यांत घाली. त्याच्या व्यतिरिक्त तिला सोन्याचा विटाळ होता. घरांत एवढी लक्ष्मी आणि त्याचा अनुभव घेणारी देवी अहिल्याबाई त्या दागिन्या आणि सोनेंमोत्यांपासून अगदीं अलग. माल्कम साहेब ह्मण-तात "स्त्री असून तिच्यांत अभिमान नव्हता. धर्मवेड तिच्यांत बरेंच दिसे, पण इतर धर्मांचा छळ करण्याचा विचार तिला जि-वलासुद्धां नाहीं. धर्माकडे व परमार्थविषयांत दंग ती होती, पण प्रजेच्या कल्याणाकडे तिचा मनस्वी ओढा. अत्यंत दक्षतेनें व कर्तृत्वानें निर्बंधसत्ता अहिल्याबाई चालवी. पण निष्कपटीपणा, लीनता, व मनुष्याच्या शक्तीवर सदसद्विचारशक्ति नीतीचा जि-तका बळकट ताबा बसवूं शकते तितकाच अहिल्याबाईवर नी-तीचा ताबा असे, आणि इतकें असूनही इतरांच्या कमीपणावि-षयीं व चुकांविषयीं तिची क्षमाशील वृत्ति"! आह्मां लोकांनीं अहिल्याबाईचें विनाकारण व नसतें इतकें स्तोम माजविलें असेल, आणि भांगेंत तुळस अथवा एरंडोपि द्रुमायते अशी अहिल्या-बाईची कीर्ति झाली असेल, इतक्या तऱ्हेचा कोटिक्रम करणारी मंडळी आमच्यांतच कमी नाहीं. अतिशयोक्तीची आमच्या दे-शांत आधींच समृद्धि, तेव्हां त्यांतीलच हें एक प्रकरण अशीही कोणाला शंका येण्याचा संभव मात्र अलीकडल्या मंडळींत आहे. सर माल्कम साहेब इंग्रज. पक्के ख्रीस्तभक्त. इंग्रज बडे अंमल-दार. त्यांचा हातचा लेख असा आहे. अहिल्याबाईचें "चित्र काढितांना खूपच रंग भरून लोक त्यांत चमक आणीत अस-

तील ह्मणून मी सर्व तऱ्हेच्या व सर्व वर्णांच्या लोकांपाशीं पुरता तपास करूं लागलों, परंतु जेव्हां जेव्हां तिचें नांव निघे तेव्हां तेव्हां लोक तिची स्तुतिच करीत; स्तुति करीत काय, आशीर्वादाचा तिच्यावर वर्षाव करीत. खरोखरीच लोकांच्या या बुद्धींत फरक पडावा अशी एकही गोष्ट माझ्या कानीं आली नाहीं. जितका जितका जास्त शोध करावा तितकें तितकें जास्त जास्त कौतुक वाटावें." आणखी हेच साहेब पुढें एके ठिकाणीं ह्मणतात "लोकांनीं तिच्या नांवास साधुसंतांची योग्यता दिली आहे व ते तिला ईश्वर लेखितात. तिच्या गुणांविषयीं फार सावधगिरीनें जरी विचार केला तरी असें खचीत दिसून येईल कीं, पृथ्वीवर जे अत्यंत पवित्र व अनुलक्षानें चालणारे अधिकारी उत्पन्न होतात त्यांपैकीं ती एक होती." आणखी एक उतारा देऊन हें प्रकरण बस्स करूं. "खरोखर **अहिल्याबाई** अद्वितीय स्त्री" आतां यापेक्षां आणखी दुसरी कोणती खात्री हवी आहे! इंग्रज इतिहासकारांनीं तर तिचें स्तोत्र इतकें निर्मळ गाइलें आहे. पण नशीब आमचें! आमच्या इतिहासकारांना त्या देवीचें स्मरणच नाहीं! खचीत आमच्यासारखे गाजरपारखी, कृतघ्न आणि अ-

---

१. आमच्या लोकांचा स्वभाव जात्याच कृतघ्न दिसतो. आणि तो तसा आहे ह्मणूनच केवळ परोपकाररत अशीं माणसें आमच्यांत निपजत नाहींत. हल्लींच्या काळाला विलायतेकडे जसे कट्टे देशभक्त आणि परोपकाररत पुरुष निर्माण झाले व होताहेत तसे आमच्याकडे निपजावयाला पाहिजेत. पण त्या प्रकारचें रोप इकडे रुजूं देण्याइतकी आमचे लोकांत कृतज्ञताबुद्धि नाहीं. परवां नुक्तेच कांहीं महिन्यांखालीं पुण्याला रा. **सीतारामपंत चिपळूणकर** वारले. या सद्गृहस्थांनीं आपलें सारें तारुण्य आणि आपली एकंदर बुद्धि राष्ट्रसेवेंत घालविली ही गोष्ट कोणासही नाकबूल करितां यावयाची नाहीं. ते अगदीं निष्कांचन होते व त्यांच्या पश्चात् त्यांच्या कुटुंबाची खरोखर दैना

भिमानशून्य आहीच. असलें उमदें स्त्रीरत्न आमच्या मंडळांत पैदा झालें पण त्याची कीर्ति कितीजणांनीं गाइली? आणि गाइलेली ऐकणारे कोण व कोठें आहेत? आणि तेंही खरें नाहीं ऐकिलें ह्मणून त्या देवीला काय त्याची पर्वा?

१० **कन्याविरह:**–**अहिल्यादेवी** सदासर्वकाळ आपलें आयुष्य ईश्वरचिंतनांत वेंची. पूजाअर्चा व्रतवैकल्यें यथासांग करी. धर्मादाय तर तिचा हातखंडा. पुराणश्रवण अहर्निश तिचें चाललेलें. पण ईश्वराचा तिच्यावर कोप आहे तो आहेच! तिचा एकुलता एक मुलगा **मालेराव** वारला व त्याचें दुःख ती विसरते न विसरते तोंच तिच्यावर दुसऱ्या दुःखाचा डाग परमकारुणिक ईश्वरानें देण्यास कमी केलें नाहीं. **मुक्ताबाई** नांवाची तिला एक मुलगी असे. तिच्या पोटीं एक मुलगा झाला. नातू झाला हा आनंद आणि तो डोळ्यांदेखत मेला हें दुःख अहिल्याबाईनें अनुभोगिलें. पण इतक्यांत **अहिल्याबाईचा** जांवईही वारला. त्याचें नांव **नथोबा.** आडनांव **पाणसे.** नवरा मरतांच **मुक्ताबाईनें** सहगमनाची तयारी चालविली. **अहिल्याबाईला** विसांवा काय ती **मुक्ताबाई** आणि तिची ही दशा. **मुक्ताबाईनें** सहगमनाचा विचार रहित करावा ह्मणून **अहिल्याबाईनें** पुष्कळ सांगितलें, उपदेश केला, धमकी दिली, तरी **मुक्ताबाईचा** निश्चय ढळेना. शेवटीं **अहिल्याबाईनें** आपल्या मुलीच्या पायांवर डोकें ठेवून, **मुक्ताबाई** तुला ईश्वराची शपथ आहे, तुझ्या मीही पाय पडतें, मला एकटीला अशी टाकून जाऊं नको, मी कोणाकडे पा-

---

आहे. त्यांच्या मुलाला दरमहा दहा रुपये वेतन देण्याचा विचार सार्वजनिक सभेंत निघाला तर तोसुद्धां पसंत झाला नाहीं. इतर लोक काय. उदासीन. तेव्हां अशी स्थिति असल्यावर परोपकार व देशसेवा यांचें बीं रुजावें कसें?

हून उरलेले आयुष्याचे दिवस काढूं." मुक्ताबाईलाही हें भाषण ऐकून फार वाईट वाटलें. तिचा कंठ अगदीं भरून आला. नेत्रांतून अश्रुपूर लोटूं लागला! पण तिचाही कांहीं इलाज चालेना. तिनें अहिल्यादेवीस ह्मटलें "आई, तूं सांगतेस तुझी आज्ञा मी कशी मोडूं? माझें मूल मेलें आणि आतां हें सौभाग्यही चाललें. तुझ्याकरितां राहावें तर तूंही ह्मातारी. तुझ्या मागें मी कशी राहूं? आतां अन्नूनें जाण्याची संधि आहे ती पुढें कशी येईल? तूंच सांग" अहिल्याबाईनें पुष्कळ समजूत केली पण मुक्ताबाईचा निश्चय ढळेना. अखेर वेळ आलीच. मुक्ताबाई सती जाण्याकरितां निघाली. अहिल्याबाई सती जाण्याचा विधि पाहण्यास स्मशानापर्यंत गेली होती. त्यावेळची तिची स्थिति वर्णन करण्याची योग्यता व तेवढें सामर्थ्य या लेखकाच्या स्वाधीन नाहीं. तें ज्यानें त्यानें आपल्या मनाकडेच सोंपवून तेथें कल्पनेचें सहाय्य घ्यावें. दुसरा उपाय नाहीं!

चिता रचून त्यावर मुक्ताबाई चढली त्यावेळीं अहिल्याबाई तेथेंच जवळ उभी होती. दोघा ब्राह्मणांनीं अहिल्याबाईस दोन्ही हातांनीं धरिली होती. अग्नीच्या ज्वाला भडकूं लागल्या त्यावेळीं होत असलेल्या वेदना अहिल्याबाईच्यानें सहन करवेनात. तिचें मन फाटून गेलें. शोकाच्या असह्य भडक्यानें ती देहभान विसरली आणि मग तेथेंच निचेष्टित पडली. सर्व चिता जळून खाक झाली तेव्हां घटकाभऱ्यानें अहिल्याबाई शुद्धीवर आली. या हृदयविदारक प्रसंगानंतर तीन दिवस अहिल्याबाई अगदीं निचेष्टित पडून होती. अन्न नाहीं. पाणी नाहीं. किंवा कोणाशीं भाषण नव्हतें. वेळ ह्मणजे काय अजब राक्षसीण. तिनें हें अहिल्याबाईचें अति दुःसह दुःख हं हं ह्मणतां विझविलें. घटका गेली, प्रहर झाला, दिवस सरला, रात्र उलटली, आठवडा संपला, त-

सतशा दुःखाच्या ज्वाला जागच्या जागींच विझूं लागल्या. पण या दुःखकारक प्रसंगानंतर **अहिल्याबाई** फार दिवस जगली नाहीं ! तिचा अंतकाळ समीप आला.

११ **शेवटः**—इतका वेळ मोठ्या आनंदानें गाइलेल्या अति पवित्र चरित्राचा शेवट लावण्याची वेळ आली. **अहिल्यादेवी** आपल्या वयाच्या ६० व्या वर्षीं ह्मणजे इ. स. १७९५ सालीं हा लोक सोडून चालती झाली ! मुलीच्या मरणाचा धक्का बसला तो तिला सांवरतां आला नाहीं. ह्यातारपण, राज्यकारभाराची दगदग, व्रतनियमें, उपासतापास, इत्यादिकांचे श्रम यांहींकरून तिचें शरीर आधींच खंगलें होतें. ईश्वरीयोजना ही. तिला एथें मृत्युलोकीं फार वेळ ठेवण्याचें नव्हतें, आणि तिची पुण्यकारक कारकीर्द तिच्या प्रजेला जास्त दिवस लाधूं देण्याचें ईश्वराला आवडलें नाहीं ह्मणून तिचा या लोकांतला कारभार ईश्वरीयोजनेनें लौकरच आटोपला. तरी महद्भाग्य आमच्या लोकांचें कीं हें असलें रत्न तीस वर्षें तरी लाधलें ! अस्तु. **अहिल्याबाई** साधारण दुखण्यानें आजारी पडली आणि त्यांतच तिचा शेवट झाला हें कांहीं पुनः पुनः सांगावयाला नको. आणि या अति नीतिमान पुण्यश्लोकसाध्वीचें चरित्रही जास्त कांहीं सांगण्याजोगें नाहीं !

ठाणे